# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - ३ जुन २०२५

---

**जळगाव** दि.३ (प्रतिनिधी) : उद्योगांच्या सहकार्याने शैक्षणिक शिक्षण आणि औद्योगिक पध्दती यामध्ये अद्ययावत शिक्षणाचा सेतु बांधणारी “कबचौउमवि- शिक्षकांकरीता इंडस्ट्री इमर्शन योजना” या अनोख्या व नव्या योजनेला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षेतेखली झालेल्या सभेत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात अशी योजना सुरु करणारे हे एकमेव विद्यापीठ आहे.

उपयोजित आणि उद्योगाशी संबंधीत शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच अनुभवात्मक शिक्षणास चालना मिळण्यासाठी व शैक्षणिक उद्योग संबंध मजबुत करण्यासाठी विद्यापीठाच्या प्रशाळेतील शिक्षकांसाठी ही योजना विद्यापीठ परिसरातील शिक्षकांमध्ये तांत्रिक कौशल्ये, औद्योगिक क्षेत्रात व्यवहारीक ज्ञान वाढविण्यास मदत करील या उद्देशाने या योजनेची नियमावली वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने तयार केली आहे.

विद्यापीठातील शिक्षक यांनी या योजनेअंतर्गत उद्योगांमध्ये प्रत्यक्ष जाऊन तेथील तांत्रीक कौशल्ये व अद्ययावत ज्ञान आत्मसात करणे, औद्योगीक क्षेत्रातील नवनवीन व अद्ययावत तंत्रज्ञान, यंत्र सामुग्री यांची माहिती घेणे व तेथील आव्हानांचा व कार्यपध्दीतीचा अभ्यास करणे, औद्योगीक क्षेत्रातील गरजा व सद्यस्थीती पाहुन त्यांच्या अपेक्षा जाणुन घेणे, अभ्यासक्रमातील पुस्तकी शिक्षण व उद्योगातील प्रत्यक्ष कार्यपध्दती या मध्ये सेतु तयार करुन दरी कमी करणे, या सर्व बाबींचा प्रत्यक्ष शिक्षकांनी केलेली निरीक्षणे, घेतलेले अनुमान यांचा अहवाल तयार करुन विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये त्या ज्ञानाचा समावेश करणे तसेच अशा उद्योगांसोबत सामंजस्य व सहकार्याचे करार करुन विद्यार्थ्यांना अशा अद्ययावत उद्योगांमध्ये इंटर्नशिप,रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देऊन उद्योगांसमवेत प्रकल्प राबविणे.अशा हेतुने ही योजना तयार करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत एकावेळी विद्यापीठाच्या एका प्रशाळेतील जास्तीत जास्त २ शिक्षक यांना लाभ घेता येईल. संबधीत प्रशाळेने असे उद्योग त्यांच्या विषयानुसार निवडायचे आहेत. शिक्षकांना उन्हाळी सुट्यांमध्ये किमान १ आठवडा उद्योगात जाऊन काम करणे आवश्यक राहील. त्याकरीता विद्यापीठाकडून संबंधीत शिक्षकांना प्रवास खर्च व इतर आवश्यक भत्ते विद्यापीठाकडून अदा केले जातील. या आगळयावेगळया योजनेला व्यवस्थापन परिषदेच्या ३० मे रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.अशी योजना सुरु करणार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे राज्यात एकमेव विद्यापीठ आहे.

## बातमी क्र-२

**जळगाव दि.३ (प्रतिनिधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक सायकल दिनानिमित्त विद्यापीठात आयोजित सायकल रॅलीस आज मंगळवार दि.३ जून, २०२५ रोजी सकाळी ७.०० वाजता प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरूवात करण्यात आली.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. इंगळे यांनी सांगितले की, पर्यावरण व निसर्ग वाचविण्यासाठी सायकलचा जास्तित जास्त वापर करावा जेणे करुन प्रदुषण कमी करण्यास मदत होऊन निसर्गातील पर्यावरणाचे संवर्धन होईल. याशिवाय सायकलिंगमुळे शरीरातील सर्व स्नायुंचा व्यायाम होऊन आरोग्य सुदृढ राहते. या प्रसंगी रासेयो संचालक प्रा.सचिन नांद्रे, प्रा.किशोर पवार, प्रा. दीपक दलाल, प्रा.मनोज पाटील, जळगाव सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष निलेश चौधरी, धुलिया सायकल मार्टचे समीर रोकडे यांच्यासह सायकलिस्ट राम घोरपडे, रूपेश भाऊ महाजन, सखाराम ठाकरे, इरफान पिंजारी. डॉ. अनघा चोपडे, कामिनी धांडे, समीर रोकडे, सुनील चौधरी, स्वप्निल मराठे, मोहन गाडे, राजू सोनवणे, निलेश, अनिकेत पवार, आरती व्यास, दर्शन महाजन, दिपक महाजन, डॉ. सुयोग चव्हाण, रितेश विद्याधर, भूपेश व्यास, चेतन महाजन, मथुरा गाडे, कमलेश पाटील, अजय ढेकळे, सुरज नेमाडे. प्रवीण कोल्हे, रूपाली पाटील, मनोज सी. पाटील, राजेश पाटील, संजय सपकाळे, अजय पाटील, बी.टी. बाविस्कर.डॉ. विजय घोलप, प्रमोद नारखेडे, छाया ढोले, चंदन महाजन, प्रदीप सोलंकी, वैभव बडगुजर, शारदा खडके, राजू मराठे, रोहित महाजन. मुकेश कुरील, दिपक ठोसर, डॉ. योगेश सूर्यवंशी, देवीदास जगताप, मनीष उपाध्याय, दीपमाला काळे, गणेश महाजन, अभिषेक सिंग व चंद्रकांत अमोडकर हे सर्व रॅलीत उपस्थित होते. सुत्र संचालन सुभाष पवार यांनी केले. सायकल रॅलीच्या यशस्वीते साठी राष्ट्रीय सेवा कक्षाचे कक्षअधिकारी शरद पाटील, कर्मचारी शिवाजी पाटील,कैलास औटी,विजय बिऱ्हाडे, विलास पाटील,सौरभ साबळे व वैभव बाविस्कर यांनी मेहनत घेतली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.विनोद पाटील
कुलसचिव